**ठळक बातम्या**

- देशातल्या महत्त्वाच्या ६० रेल्वे स्थानकांवर कन्फर्म तिकिट असलेल्या प्रवाशांना, फलाटावर गाडी आल्यावरच प्रवेश देण्याचा रेल्वेचा निर्णय
- वीज ग्राहकांच्या फायद्यासाठी राज्य सरकार प्रधानमंत्री मोफत सूर्यघर योजनेसारखी योजना सुरू करणार, ग्रामीण भागात सिमेंटचे रस्ते बांधण्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा
- महिलांसाठीच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी गाव पातळीवर आदिशक्ती समिती स्थापन होणार, उद्या महिला दिनानिमित्त विशेष ग्रामसभा

**आणि**

- भारतीय महिला संघ आशियाई कबड्डी स्पर्धेच्या अंतिम फेरीत

**<><><><><>**

देशातल्या महत्त्वाच्या ६० रेल्वे स्थानकांच्या फलाटावर गाडी आल्याशिवाय प्रवाशांना प्रवेश मिळणार नाही. गाडी येईपर्यंत या प्रवाशांना स्थानकाबाहेरच्या प्रतीक्षा गृहात थांबावं लागेल. रेल्वे स्थानकांवर होणाऱ्या गर्दीचं नियंत्रण करण्यासाठी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्या अध्यक्षतेखाली नवी दिल्लीत झालेल्या बैठकीत हा निर्णय झाला. नवी दिल्ली, आनंद विहार, वाराणसी, अयोध्या आणि पाटणा स्थानकावर याची प्रायोगिक तत्त्वावर अंमलबजावणी सुरू झाली आहे.

देशभरातल्या ६० स्थानकांवर प्रवेशाचं संपूर्ण नियंत्रण केलं जाणार असून केवळ कन्फर्म तिकीट असणाऱ्या प्रवाशांना फलाटावर प्रवेश दिला जाईल.

प्रतीक्षा यादीतलं किंवा इतर तिकिट असलेल्यांना स्थानकाबाहेरच्या वेगळ्या प्रतीक्षालयात थांबावं लागेल. अवैधरित्या स्थानकात होणारे प्रवेश रोखण्यासाठी इतर प्रवेश मार्ग बंद करण्याचा निर्णयही रेल्वेनं घेतला आहे.
महाकुंभ मेळ्यात गर्दीच्या नियंत्रणासाठी उपयोगी पडलेले रुंद पादचारी पूल, सीसी टीव्ही कॅमेऱ्याद्वारे निगराणी, वॉर रूमची स्थापना असे पर्याय वापरण्याचा निर्णयही घेण्यात आला. सर्व रेल्वे स्थानकांवर स्थानक संचालक म्हणून एका वरिष्ठ अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याचा निर्णयही झाला. गर्दी टाळण्यासाठी या अधिकाऱ्याला तिकीट विक्रीवर निर्बंध लादण्याचेही अधिकार असतील. रेल्वेच्या कर्मचाऱ्यांना नव्यानं तयार केलेलं ओळखपत्र आणि गणवेशही दिला जाणार आहे.

<><><><><>

दादरा आणि नगर हवेली, दीव आणि दमण हे केंद्रशासित प्रदेश देशाचा वारसा असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज सांगितलं. गुजरातच्या सिल्व्हासा इथं आयोजित सभेत ते बोलत होते. गेल्या काही वर्षांत, केंद्रशासित प्रदेशांनी जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा, दळणवळण, आरोग्यसेवा, शिक्षण आणि पर्यटन विकास साधत स्वतंत्र वेगळी ओळख निर्माण केल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले.

देश निरोगी असेल तरच विकसीत भारताचं स्वप्न साकार होऊ शकतं असं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं. सर्वसामान्य नागरिकांना मुलभूत आरोग्य सोयी-सुविधा पुरवण्यासाठी आणि त्यांना परवडेल अशा किमतीत औषधं उपलब्ध करून देण्यासाठी जनऔषधी केंद्रांचं जाळे देशात विस्तारलं जात असल्याचं प्रधानमंत्री म्हणाले.

प्रधानमंत्र्यांनी यावेळी विविध विकास कामांचं उद्घाटन आणि पायाभरणी केली.

<><><><><>

प्रधानमंत्री मोफत सूर्यघर योजनेच्या धर्तीवर राज्य सरकार नवी योजना आणणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केली. राज्यपालांच्या अभिभाषणावरच्या चर्चेला उत्तर देताना ते विधानसभेत बोलत होते. स्मार्ट मीटर लावणाऱ्या घरगुती ग्राहकांना  दिवसा वापरलेल्या वीजेवर सवलत देणार असल्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी सभागृहात केली.
प्रधानमंत्री आवास योजनेच्या अंतर्गत बांधल्या जाणाऱ्या घरातही सोलर पॅनल लावून देणार असल्याचं ते म्हणाले. राज्य सरकारनं बहुवार्षिक वीजदर याचिका सादर करत वीज दरात मोठी कपात करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे आगामी पाच वर्षांत ग्राहकांना दरवर्षी ९ टक्के दरवाढ सोसावी लागणार नाही, उलट वीज दर २४ टक्क्यांनी कमी होणार आहे, असं त्यांनी सांगितलं.
राज्यात ग्रामीण भागातले 14 हजार किलोमीटरचे रस्ते सिमेंट काँक्रीटचे करण्यात येणार आहे.  तसेच १ हजार लोकसंख्या असलेल्या सुमारे ४ हजार गावांमध्ये सिमेंट काँक्रिटीकरणाचा प्रकल्प राबविण्यात येईल, असंही त्यांनी यावेळी जाहीर केलं.

<><><><><>

राज्य शासनाच्या विविध योजना महिलांपर्यंत पोहोचवण्यासाठी गाव पातळीवर आदिशक्ती समिती या नावाने महिलांची एक विशेष समिती स्थापन

केली जाईल, अशी घोषणा महिला आणि बालविकास खात्याच्या मंत्री आदिती तटकरे यांनी आज विधानसभेत केली. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या बद्दल कृतज्ञता व्यक्त करणारा तसेच महिला दिनानिमित्त महिलांबाबतच्या विविध विषयांवरील विशेष चर्चेला त्या उत्तर देत होत्या. महिला दिनाच्या निमित्ताने राज्यभर सर्व ग्रामपंचायती मध्ये विशेष ग्रामसभा आयोजित करून महिला दिन साजरा करण्याच्या सूचना देण्यात आल्याचं त्यांनी सांगितलं.

राज्यातील सर्व महामार्गांवर प्रत्येक पन्नास किलोमीटर अंतरावर महिलांसाठी स्वच्छतागृह आणि त्या शेजारी विक्री स्टॉल उपलब्ध करून दिले जातील अशी माहिती देखील तटकरे यांनी यावेळी दिली. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेतून एकही पात्र महिला वगळली जाणार नाही अशी ग्वाही देखील त्यांनी यावेळी दिली.

<><><><><>

आकाशवाणीचा वृत्तविभाग उद्याचा जागतिक महिला दिन अनोख्या रीतीनं साजरा करणार आहे. आज मध्यरात्रीपासून पुढचे २४ तास प्रसारित होणारी सर्व हिंदी आणि इंग्रजी बातमीपत्र महिला वृत्तनिवेदकच सादर करणार आहेत. वृत्त विभागाचा उद्या दिवसभराचा कारभारही महिला कर्मचारी वर्गच सांभाळणार असून महिला दिनानिमित्त उद्या रात्री एका विशेष चर्चासत्राचं प्रसारण केलं जाणार आहे.

**<><><><><>**

वर्धा इथल्या गृहिणी असलेल्या स्नेहलता सावरकर यांनी आपल्या मेहनत आणि आत्मविश्वासाच्या बळावर अळंबीचा व्यवसाय सुरू केला आहे. अळंबीपासून त्या विविध पदार्थ बनवतात. याविषयी त्यांनी आकाशवाणीला अधिक माहिती दिली.

**होल्ड बाईट - स्नेहलता सावरकर..**

**<><><><><>**

सहाव्या आशियाई महिला कबड्डी अजिंक्यपद स्पर्धेत भारतीय संघ अंतिम फेरीत पोहोचला आहे. उपांत्य फेरीत नेपाळच्या संघाला भारतीय महिलांना ५६-१८ असं नमवलं. सध्या इराण आणि बांग्लादेश यांच्यात उपांत्य फेरीतला सामना सुरू आहे. गेल्यावेळी झालेल्या या स्पर्धेत कोरियाला नमवून भारतीय संघानं अजिंक्यपदक पटकावलं होतं.

**<><><><><>**

भारत आणि अमेरिका हे दोन्ही देश द्विपक्षीय व्यापार व्यापार करारावर चर्चा पुढे नेण्याच्या प्रक्रियेत असल्याची माहिती परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी दिली आहे. ते आज नवी दिल्लीत माध्यमांशी बोलत होते. गेल्या महिन्यात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अमेरिका दौऱ्यावेळीच दोन्ही देशांनी परस्पर सहकार्य, बहुक्षेत्रीय द्विपक्षीय व्यापार करारावर चर्चा करण्याविषयी जाहीर करण्यात आलं होतं.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या ११ तारखेपासून मॉरिशसच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर जाणार असल्याची माहितीही जयस्वाल यांनी यावेळी दिली.

प्रधानमंत्री १२ मार्च रोजी मॉरिशसच्या राष्ट्रीय दिनाच्या समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून सहभागी होणार आहेत. या भेटीदरम्यान, प्रधानमंत्री मॉरिशसच्या राष्ट्रपतींची तसंच प्रधानमंत्र्यांची भेट घेतील, असंही जयस्वाल सांगितलं.

<><><><>

भारतीय वायू दलाचं एक जग्वार विमान आज हरियाणातल्या अंबाला इथं कोसळलं. नियमित प्रशिक्षण उड्डाणादरम्यान तांत्रिक अडचणींमुळे हे विमान कोसळल्याचं वायू दलानं म्हटलं आहे. वैमानिकानं या विमानातून बाहेर पडण्यापूर्वी ते लोकवस्तीच्या भागातून सुरक्षित बाहेर नेलं होतं. या दुर्घटनेच्या कारणांच्या चौकशीचे आदेश वायू दलानं दिले आहेत.

<><><><>

आंतरराष्ट्रीय सागरी सीमेचं उल्लंघन केल्याचा आरोप करत श्रीलंकेच्या नौदलानं काल रात्री आणखी १४ भारतीय मच्छीमारांना तामिळनाडू मधल्या पंबन इथून ताब्यात घेतलं. २३ फेब्रुवारीलाही श्रीलंकेच्या नौदलानं ३२ भारतीय मच्छीमारांना त्यांच्या बोटींसह अटक केली होती.

<><><><>

पंजाब पोलिसांनी बीकेआय अर्थात बब्बर खालसा आंतरराष्ट्रीय गटाचा पाठिंबा असलेल्या अतिरेक्यांच्या एका गटाच्या तीन हस्तकांना आज जालंधरमध्ये शस्त्रांसह अटक केली. अतिरेक्यांचा हा गट राष्ट्रविरोधी कारवाया करण्यासाठी युवकांना प्रोत्साहन देत असल्याचं उघडकीला आलं आहे.

**<><><><><>**

भारत-बांगलादेश संयुक्त नदी जल  आयोगाच्या तांत्रिक समितीची आज कोलकाता इथं सलग दुसऱ्या दिवशीही बैठक झाली. या बैठकीत गंगा नदीच्या पाण्याचं वाटप, विविध नद्यांना येणाऱ्या महापुरांचं नियंत्रण करण्यासाठी आवश्यक भासणारं परस्पर सहकार्य तसंच सिंचन प्रणाली मध्ये कराव्या लागणाऱ्या सुधारणा,  यांसारख्या मुद्द्यांवर चर्चा झाल्याचं सूत्रांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

दक्षिण कोरियात मार्शल लॉ लागू केल्याप्रकरणी महाभियोग खटला दाखल झालेले राष्ट्रपती यून सुक येओल यांची अटक रद्द करण्याचे आदेश एका जिल्हा न्यायालयानं दिले आहेत. न्यायालयानं दिलेल्या या निर्णयानंतर राष्ट्रपती येओल यांची कारागृहातून सुटका झाल्याचं वृत्त आहे.

**//<><><><><>//**